बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १४८ वा | मंगळवार दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### अवैध गांजा जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा नोंद

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत कमल रा. मुन्सी प्लॉट उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१६.०८.२०२५ रोजी मुन्सी प्लॉट धाराशिव येथे ७१९ ग्रॅम हिरवट रंगाचा उग्र वास येत असलेला पाने, बिया, काड्यासह असलेला अंमली पदार्थ गांजा ज्याचे कॅरीबॅगसह १०,७८५ किंमतीचा बेकायदेशीर रित्या स्वताचे कब्जात बाळगलेला मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ कलम ८ (क), २०(ब)(ii) (अ) अन्वये उमरगा पो. ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे माधव सिध्दु ढोणे, वय ७० वर्षे, रा. भिमनगर कुन्हाळी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे राहते घराचे बंद खोलीचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.०९.०३.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील ३९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम ८५,००० असा एकुण २,०६,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-माधव ढोणे यांनी दि.१६.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### टेम्पोतील मालाची अज्ञाताने केली चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुरेश तमन्ना कोळी, वय ६० वर्षे, रा. दयानंद कॉलेज शेजारी गुजरवस्ती रविवार पेठ उत्तर सोलापूर जि. सोलापूर हे १४.०८.२०२५ रोजी वाशी शिवारात एनएच ५२ रोडवर घुले माळ येथे अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे टेम्पोतील अंदाजे १,५२,००० किंमतीचा माल रेडबुल एनर्जी कॅनबॉक्स ८४, सनसिल्क थीक लॉन्ग शाम्पु ११ बॉक्स,डव्ह शॉम्पु बॉक्स हे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुरेश कोळी यांनी दि.१६.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

# जमीन खरवडली, विहिरीत गाळ, ड्रीपसेटही वाहून गेले

## पंचनामे सुरु-आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- जिल्ह्यातील अनेक भागात अतिवृष्टी झाली आहे. काही ठिकाणी तर ढगफुटी सदृश्य परिस्थिती आहे. वाशी तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे तेरणा आणि मांजरा नदीला पूर आला आहे. अनेक ठिकाणी अक्षरशः शेतजमीन पूर्णतः खरवडून गेली आहे. पुराच्या पाण्यामुळे विहिरी गाळाने भरल्या आहेत तर काही ठिकाणी शेतातील ड्रिपसेटही वाहून गेले आहेत. प्रशासनाला या सगळ्या बाबींचे तातडीने पंचनामे करण्याबाबत सूचना दिल्या असून पंचनामे सुरु देखील करण्यात आले आहेत. शेतकरी बांधवांनीही आपापल्या परिसरात झालेल्या नुकसानीची तक्रार संबंधित तलाठ्यांकडे तातडीने दाखल करावी, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

कळंब तालुक्यातील खोंदला गावात पुराच्या पाण्यात अडकलेल्या आपल्या एका सहकाऱ्याच्या अद्यापही शोध सुरूच आहे. दुर्दैवाने या शोधकार्यात अद्यापपर्यंत आपल्याला यश आलेले नाही. तेरणा धरण शंभर टक्के भरले आहे. मांजरा धरणातही मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. मांजरा धरणात देखील मोठ्या वेगाने पाणी दाखल होत असल्याने लवकरच मांजरा धरणही शंभर टक्के भरेल अशी स्थिती आहे. जिल्ह्यातील अनेक भागात मोठा पाऊस झाला आहे. कळंब आणि परिसरातील पावसाची आकडेवारी अभूतपूर्व आहे. इटकूर परिसरात मागील चाळीस वर्षांत असा पाऊस झाला नसल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले. इटकूर गावातील पुलावर जवळपास ५ तास दोन ते तीन फूट पाणी होते. त्यामुळे परिसरातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतजमीन पूर्णतः खरवडून गेली असल्याचे दिसत आहे. नदीकाठी असलेल्या शिवारातील पिके पाण्याखाली गेली आहेत. सर्व तहसीलदार आणि तलाठ्यांसोबत तातडीने संपर्क साधून तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आज प्रत्यक्ष पंचनाम्यांना सुरुवात देखील झाली आहे. शेतकरी बांधवांनीही तलाठ्यांकडे तातडीने नुकसानीच्या तक्रारी सादर कराव्यात कराव्यात, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. अनेक भागात जनावरे दगावली असल्याची माहिती उपलब्ध होत आहे. शेतकरी बांधवांनी नुकसानीची माहिती आणि जनावरे दगावली असल्यास याबाबतही तातडीने तक्रारी सादर कराव्यात. पुढील दोन-तीन दिवस आणखी पावसाचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे अधिक खबरदारी घेणे आवश्यक आहे. बहुतांश बंधारे पूर्ण क्षमतेने भरून वाहत आहेत. अनेक साठवण तलाव, मध्यम प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. यामुळे पुढील पाऊस जास्त नुकसानकारक ठरण्याची भीती आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी व आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिल्या आहेत.

स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणा नंतर कुठल्याही प्रशासकीय बैठकीला हजेरी न लावता तातडीने बांधावर जाऊन उद्भवलेल्या पूर परिस्थितीची व नुकसानीची पाहणी केली. सगळी माहिती जाणून घेतली. प्रशासनाला युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत मिळवून देण्यासाठी नेहमीप्रमाणे आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार **राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.**

**खोंदला गावात एनडीआरएफचे पथक**

खोंदला येथील शेतकरी पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानंतर त्यांच्या शोधासाठी मोहीम सुरू करण्यात आली. सुरुवातीला ड्रोन द्वारे त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. धाराशिव येथून एनडीआरएफच्या पथकास देखील पाचारण करण्यात आले. बोटीच्या सहाय्याने या पथकाकडून पुरात अडकलेल्या शेतकऱ्याचा शोध अद्याप सुरू आहे.

कृषीमंत्र्यासोबत संपर्क, शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती

# तुळजापूर शहर व मंदिर विकास आराखड्यातून कोणावरही अन्याय होऊ देणार नाही-पालकमंत्री प्रताप सरनाईक




धाराशिव (जिमाका)-राज्य सरकारने तुळजापूर शहर व श्री तुळजाभवानी मंदिर व परिसर विकास आराखडा हाती घेतला असून या आराखड्यातून कोणावरही अन्याय होऊ देणार नाही,असे आश्वासन पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांनी दिले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा राबविताना विस्थापित पुजाऱ्यांना जागा निश्चित करण्याबाबत आयोजित बैठकीत पालकमंत्री श्री.सरनाईक बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,माजी आमदार ज्ञानराज चौगुले,जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,पोलीस अधीक्षक शफकत आमना,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,तुळजापूर उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश देशमुख,श्री तुळजापूर मंदिर संस्थानचे व्यवस्थापक तथा तहसीलदार अरविंद बोळंगे,मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे,पुजारी मंडळाचे श्री.बिपीन शिंदे,धीरज पाटील तसेच विस्थापित होणारे काही नागरिक यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.सरनाईक म्हणाले की, तुळजापूर हे धार्मिक,सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे ठिकाण आहे.दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात.त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा,रस्ते,पाणीपुरवठा, स्वच्छता व वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे ही काळाची गरज आहे.असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, मंदिर विकास आराखडा हा केवळ दगड,सिमेंट व इमारतींच्या उभारणीपुरता मर्यादित नसून तुळजापूरच्या सर्वांगीण विकासाचे दर्शन घडवणारा असेल.स्थानिक नागरिक,व्यापारी,सेवेकरी व भाविक यांचे हित जोपासूनच विकासकामे राबवली जातील. कोणत्याही कुटुंबाचे नुकसान होईल असा निर्णय घेतला जाणार नाही.विकास आराखड्यामुळे रोजगार निर्मिती,पर्यटन वाढ,व्यापार वृद्धी आणि सोयी-सुविधांचा दर्जा उंचावेल,असे त्यांनी यावेळी नमूद केले.

श्री तुळजाभवानी मंदिर हा महाराष्ट्राच्या जनतेच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे.त्यामुळे मंदिर परिसरातील सौंदर्यीकरण,वाहतूक व्यवस्थापन,निवास व भोजनाची योग्य व्यवस्था,स्वच्छता व पर्यावरण संतुलन या गोष्टींवर विशेष भर देण्यात येणार आहे.भाविकांना त्रास होणार नाही आणि स्थानिकांचा व्यवसाय अबाधित राहील यासाठी नियोजनात लवचिकता ठेवण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री श्री.सरनाईक पुढे म्हणाले की,या विकास आराखड्यासाठी राज्य शासनाने आवश्यक निधीची तरतूद केली आहे.आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक प्रतिनिधी,प्रशासन,नगरपरिषद व मंदिर व्यवस्थापन यांच्यात समन्वय साधण्यात येणार आहे.तुळजापूरचा विकास म्हणजे केवळ एका शहराचा विकास नसून,हा लाखो भाविकांचा विश्वास आणि भावनांचा सन्मान आहे.त्यामुळे या आराखड्याबाबत कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता सर्वपक्षीय सहकार्य आवश्यक आहे,असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

शेवटी पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी नागरिकांना आवाहन केले की, विकास प्रक्रियेत प्रशासनाला सहकार्य करावे,आपल्या सूचना मांडाव्यात आणि तुळजापूर शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावावा.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संभाजीनगर जळकोट येथे दहीहंडी सोहळा उत्साहात साजरा



जळकोट (प्रतिनिधी)- श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संभाजीनगर जळकोट येथे दहीहंडी सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. सुरुवातीला भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे व हंडीचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार उपाध्यक्ष शकील मुलाणी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी निळकंठ इटकरी सर यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक सणांचे महत्त्व समजावून सांगितले. मुख्याध्यापिका रेणुके मॅडम यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना परंपरा, एकता आणि सहकार्याची जाणीव ठेवून समाजासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनीनी गवळणी वर आकर्षक टिपरी नृत्य सादर करून उपस्थितीताना भारावून सोडले. गोपाळकाला, नृत्य, व भजन यांच्या माध्यमातून कृष्णजन्माचा उत्सव सादर केला. छोट्या गोकुळातील बाळकृष्ण व गोपिकांच्या वेशात आलेल्या बालकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर लहान गोविंदांनी पारंपरिक पद्धतीने थर लावून दहीहंडी फोडण्याचा रोमांचक उपक्रम राबविला. गोविंदा आला रे आला या गजराने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. दहीहंडी फुटताच सर्वत्र जल्लोष झाला. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सामूहिक कार्यभावना अनुभवण्याजोगी होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेणुके मॅडम, इटकरी सर, अभिवंत सर, वनवे सर, मुरमुरे सर, चव्हाण सर, कुडकले सर, आहेरकर सर व श्रीकांत कदम सर यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. हा दहीहंडी सोहळा शाळेच्या वार्षिक उपक्रमांमध्ये अविस्मरणीय ठरला असून विद्यार्थ्यांच्या मनावर गोड आठवणींची छाप सोडून गेला.

या कार्यक्रमासाठी पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहत अर्बन क्रेडिट को-ऑप पतसंस्था लि. धाराशिवची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी) - राहत अर्बन क्रेडिट को-ऑप पतसंस्था लि. धाराशिवची १७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच धाराशिव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत पतसंस्थेच्या गेल्या वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी वर्षासाठी महत्त्वाचे ठराव सर्वसंमतीने मंजूर करण्यात आले.

या पतसंस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे ती ना नफा - ना तोटा या तत्वावर चालते. कुरआनमधील पवित्र पंगतीनुसार - अल्लाह व्याजाचा नाश करतो व दान-धर्मांची वाढ करतो - या तत्वज्ञानाला अनुसरून पतसंस्थेची आर्थिक रचना उभी करण्यात आली आहे. त्यामुळेच सभासदांच्या गरजेनुसार मदतीचा हात पुढे करण्यास ही संस्था सदैव तत्पर असते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण चेअरमन सजीयोद्दीन शेख यांनी केले. वार्षिक अहवालाचे वाचन सेक्रेटरी सिकंदर पटेल यांनी सादर केले. यावेळी मधुकर जाधव साहेब यांनी सहकार कायदे आणि नविन उपविधी याबद्दल सखोल मार्गदर्शन करून सभासदांना उपयुक्त माहिती दिली. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली व सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन रियाज शेख यांनी केले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून धर्मवीर कदम, गवारे साहेब, अहमद मौलाना यांच्यासह संस्थेचे संचालक, कर्मचारीवर्ग आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्राण्यांनाची निर्दयपणे कत्तल करुन चरबी विक्रीकरीता जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)-तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत मोसीन , आयुब , युनुस सर्व रा. सोलापूर यांनी दि.१७.०८.२०२५ रोजी ११.०० वा. सु. सावरगाव ते सुरतगाव जाणारे रोडवर टाटा कंपनीची इंन्ट्रा व्ही ३० क्र एमएच १३ डीक्यु ९३६५ मध्ये पंधरा लिटरचे तेलाचे ०६ डब्यामध्ये गोवंशीय जातीचे जनावरांची चरबी एकुण ३०,००० किंमतीची वाहनासह ३,३०,००० किंमतीची गोवंशीय जनावरांना ठार मारुन त्यांची कुठेतरी विल्हेवाट लावूनअवैधरित्या विक्रीसाठी घेवून जात असताना तामलवाडी पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम भा.न्या. सं. कलम ३२५, ३(५) सह ५(अ) , ९(अ) प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम ११ निमल क्रियालिटी क्ट अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## पंतप्रधानाच्या आवाहनास साथ दिली पाहिजे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना हाक दिली आहे. त्या हाकेस किंवा आवाहनास भारतीयांनी साथ दिली पाहिजे. त्यांनी भारतीय आहात तर भारतात बनलेल्या वस्तू खरेदी करा, व्यापाऱ्यांनी परदेशी उत्पादनांऐवजी भारतात बनलेली उत्पादने विकावी असे आवाहन केले. ते द्वारका एक्सप्रेसवेचे उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते. या मागील मर्म मोठे आहे. भारतीय बनावटीच्या वस्तू भारतीयांनी खरेदी केल्या तर त्याचा मोबादला भारतीयांना मिळतो. परदेशिय कंपन्याचा माल खरेदी केला तर तो पैसा परदेशियांना मिळतो. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. भारत वरचेवर स्वबळावर सक्षम होत आहे. सध्याला अमेरिका हा आर्थिकदृष्ट्या भारताला आडचणीत आणत आहे. सर्वांना कमी टैरिफ व भारताला पंन्नाटक्के लावण्याचा विचार आहे. त्यामुळे भारताला आर्थिक संकटात ओढण्याचा डाव आहे. या नव्या निर्णयाचे भारताने विरोध केला आहे. पंतप्रधान व संरक्षणमंत्री यांनी या निर्णयास कडाडून विरोध केला आहे. भारत हा आर्थिकदृष्टया सक्षम बनत आहे. वरचेवर स्वयंपुर्णता होत आहे. त्यामुळे अमेरिकेला वाईट वाटणे स्वाभाविक आहे. भारत व रशियाचे संबंध आहेत ते तोडावे कारण जगात रशिया हा देश सक्षम आहे. अमेरिकानंतर रशियाच सक्षम आहे ही बाब लक्षात घेता तसे पाहिले तर भारताशी आजचे संबंध नाहीत तर अनेक वर्षापासूनचे मैत्रीचे संबंध आहेत. भारत मोठ्या प्रमाणात रशियाकडून कच्चे तेल खरेदी करीत आहे हे अमेरिकेचे मुख्य दुखणे आहे. पकिस्तान भारताबरोबर हिंसात्मक वागत आहे असे जरी असले तरी त्याच्याशी चांगले संबंध ठेवावे असे विचार अमेरिकेंचा असू शकतो. अमेरिकेचे धोरण बाबत विचार केला तर एक बाब लक्षात येते. भारताशी ज्याच्याशी वैर आहे त्याच्याशी अमेरिका मित्रत्वाचे संबंध ठेवत आहे. बांगला देश, चीन व पाकिस्तानशी अमेरिका सवलत देत आहे. टैरिफ कमी आकरत आहे. भारताला भिती घातल्यावर घाबरेल असे वाटत आहे ते चुकीचे आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात गर्भीत ईशारा दिला आहे. मुळात अमेरिकेस भारत घाबरेल असे वाटत होते मात्र भारताची ताठर भुमिका पाहुन आतून तोही घाबरला असणार. टैरिफची झळ भारताला बसणार आहे तर अमेरिकेचा माल खरेदी केला नाही तर? त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार भारतीयांनी आंमलात आणले पहिजेत. भारतीय बनावटीचा माल खरेदी केला पाहिजे. आता भारतीय सणाची मोठी रेलचेल आहे. मोठे सण आहेत. दिवाळी पर्यंत मोठे सण आहेत. आता सणाची रेलचेल सुरु असल्याने सजावटीसाठी, देखाव्यासाठी विदेशी माल खरेदी केला जातो. विशेष करून चीनी मालाची खरेदी मोठया प्रमाणात भारतीय करतात. आता भारताने सुद्धा चीनीमालासारखे उत्पादन सुरु केले आहे. जरी महाग असली तरी ती खरेदी केली पाहिजे. ब्रिटीशांनी एक चाल खेळली होती. आपल्यादेशातून कापड मागवयाचे व भारतीय हातावर विणलेले व भारतीयांनी तयार केलेले माल विकू नये. भारतीय कारागिर उपाशी मरावेत. भारतातील उद्योग बंद पडावेत. अगोदर स्वस्तात माल विकायाचा नंतर वाट्टेल त्या किंमतीत माल विकायाचा. मोठा नफा मिळावयाचा हा वाईट हेतू होता. हे ओळखुन स्वदेशी मालासाठी बलिदान देणारे पहिले हुतात्मा बाबू गेणू होते. ब्रिटीशांनी त्यांना अंगावरून परदेशीय भरलेल्या ट्रकखाली चिरडले. त्यांचे बलिदान वाया जाऊ नये असे वाटत असेल तर आजही स्वदेशीमाल खरेदी केला पाहिजे. स्वदेशी मालावर प्रेम केले पाहिजे. कसला का होईल आपल्या देशातील बांधवांना आर्थिक मदत होते ही बाब विचारात घेतली पाहिजे. परदेशियांची नांगी ठेचायाची झाली तर एक बाब लक्षात ठेवावी लागेल ती म्हणजे स्वदेशी मालाची खरेदी! भारत हा आता काही बाबती स्वयंपुर्ण वाटचाल करीत आहे. खेळणी असो किंवा मोबाईल क्षेत्रात आघाडी घेतली आहे. जसा चीन माल तयार करीत आहे तसा भारतात माल तयार होत आहे. गुजरात राज्यात अनेक बाबी तयार होत आहे. चिरमुरापासून मोठ्या वस्तूचे उत्पादन गुजरात सरकार करीत आहे. त्यामुळे भारतीय मालावर प्रेम केले पाहिजे. परदेशीय मालावर प्रेम कराल तर आपणच आपल्या पायावर दगड मारून घेतल्यासारखे आहे. आपण परदेशियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करीत आहोत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे धाडसाने अमेरिकेला शह देत आहेत, चॅलेंज देत आहेत. याला भारतीयांनी साथ दिली पाहिजे. भारतीय तसे पाहिले तर कशातच मागे नाहीत. भारतीय ग्रामीण भागातील कुटीर उद्योगांना चालना दिली पाहिजे. अनेक शेती विषयक औजारे असोत किंवा दररोजच्या वापरातील वस्तू असोत, ते दर्जेदार बनविण्याची कला भारतीयात आहे. भारतीय बनावटीच्या वस्तू टिकाऊ असतात ही बाब लक्षात घेतली पाहिजे. चायनाचा माल घरी जाईपर्यंत टिकेल असे नाही. ही वस्तूस्थिती आहे. अनेकांनी अनुभवली आहे. त्यामुळे अमेरिकेने टैरिफ लावला आहे तो भारतीय आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्हावेत यासाठी संपुर्ण उद्योग दिसून येत आहे. भारतात सुती कापड जगात मिळणार नाही. भारतात मोठ्या प्रमाणात दर्जेदार कापूस पिकतो. त्यापासून कापड तयार करणारे कारखाने आपल्या देशात आहेत. ही बाब लक्षात घेता आपणच आपली भारतीय बाजारपेठ निर्माण करावी. भारतीय बनावटीचे माल सक्तीने खरेदी केली तर चीन हा घाबरल्याशिवाय राहणार नाही. चीनची मोठी बाजारपेठ भारत आहे. चीनी माल दसरा-दिवाळीत खरेदी नाही केला तर चीन घाबरल्याशिवाय राहणार नाही. जगातील काही प्रमुख देशाचा भारत ही बाजारपेठ आहे. केवळ आयात करून भारत संपन्न होणार नाही तर निर्यातदार मोठ्या प्रमाणात बनला पाहिजे. भारतीय मालाची निर्यात वाढली तर आर्थिक लाभ होणार आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला, त्याला मोठ्या प्रमाणात साथ द्यावी. जसे काही देश केवळ स्वदेशीचा माल वापरतात, स्वदेशी व राष्ट्रासाठी त्यागमय जीवन जगण्याची कला शिकली पाहिजे. तरच भारताकडे कोणी बोट दाखविणार नाही. आज जे गर्मीत बोलतात. त्यांनी नशा उतरल्याशिवाय राहाणार नाही.

# 'हरित लातूर'साठी सर्वजण एकजुटीने प्रयत्न करूया !-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

- वृक्षदिंडीने 'हरितोत्सव'ला सुरुवात; विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश
- रोपांच्या खरेदीसाठी लातूरकरांची सकाळपासून गर्दी; महिलांची संख्या लक्षणीय
- बचत गटांच्या स्टॉलवर बोरसुरी डाळीचे वरण, रानभाज्यांची चव चाखण्याला पसंती



**लातूर/प्रतिनिधी** : 'माझं लातूर, हरित लातूर' अभियानांतर्गत यंदा सलग दुसऱ्या वर्षी लातूर शहरातील गंजगोलाई येथे आयोजित 'लातूर हरितोत्सव'चे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. या निमित्ताने महात्मा गांधी चौक ते गंजगोलाईपर्यंत वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यंदा हरितोत्सवासोबतच रानभाजी महोत्सवाचेही आयोजन करण्यात आले होते, या महोत्सवाचे उद्घाटनही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

लातूर जिल्ह्यात झाडांची संख्या अत्यंत कमी आहे. जिल्ह्याला हरित करण्यासाठी 'माझं लातूर, हरित लातूर' अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत वृक्षलागवड मोहिमेला गती देण्यात आली असून, प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सहभागी होऊन तिला चळवळीचे स्वरूप द्यावे. 'हरित लातूर'साठी सर्वजण एकजुटीने प्रयत्न करूया, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ आणि संगीता टकले, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कोविड काळात ऑक्सिजनचे महत्त्व सर्वांना समजले आहे. त्यामुळे गावात, शहरात, घराच्या परिसरात वृक्ष लागवड करून ऑक्सिजन पार्क उभारण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. शेतीच्या बांधावर, रस्त्याच्या दुतर्फा, घराच्या गच्चीवर आणि मोकळ्या जागांवर फुलझाडे, फळझाडे लावून लातूरला हरित करण्यासाठी हातभार लावावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

रानभाज्या आरोग्यासाठी उपयुक्त असून, त्या आता दुर्मीळ होत चालल्या आहेत. नवीन पिढीला त्यांची माहिती मिळावी आणि त्यांचे महत्त्व समजावे, यासाठी आत्मा कार्यालयाने आयोजित केलेला रानभाजी महोत्सव उपयुक्त ठरेल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. यावेळी रानभाज्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे प्रकाशनही त्यांच्या हस्ते झाले.

जिल्ह्यात वृक्षलागवडीला गती देण्यासाठी शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या सहभागातून प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना रोपे आणि वृक्षलागवडीसाठी आवश्यक साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने लातूर शहरातील गंजगोलाई परिसरात 'लातूर हरितोत्सव' या अभिनव उपक्रमाचे सलग दुसऱ्या वर्षी आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच लातूरकरांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रोपे आणि वृक्षलागवडीसाठी आवश्यक साहित्याच्या विक्रीसाठी उभारलेल्या स्टॉलना भेटी देऊन नागरिकांनी रोपांची माहिती घेतली आणि खरेदी केली. रविवार हा सुट्टीचा दिवस असल्याने अनेकांनी कुटुंबासह या हरितोत्सवाला भेट देऊन फुलझाडे आणि फळझाडांच्या रोपांची खरेदी केली.

**रानभाज्या, बोरसुरी डाळीच्या वरणाचा आस्वाद घेण्यास पसंती**

यंदा हरितोत्सवासोबतच रानभाजी महोत्सवाचेही आयोजन करण्यात आले. रानभाज्यांच्या विक्रीसाठी उभारलेल्या स्टॉलवर मोठी गर्दी दिसून आली. रानभाज्यांची आणि त्यांच्या पाककृतीची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे यावेळी वितरण करण्यात आले. तसेच, जीआय मानांकन मिळालेल्या बोरसुरी डाळीच्या खरेदीसह महिला बचत गटांच्या स्टॉलवरील विविध पदार्थांचा आस्वाद घेण्यास लातूरकरांनी पसंती दर्शवली. बोरसुरी डाळ, भाकरी, थालीपीठ, धपाटे यांसारख्या पदार्थांचे स्टॉल येथे उभारण्यात आले होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी रानभाजी, बोरसुरी डाळीच्या वरणाचा यावेळी आस्वाद घेतला.

**वृक्षदिंडीतून पर्यावरण रक्षणाचा संदेश**

'लातूर हरितोत्सव'ची सुरुवात महात्मा गांधी चौक येथून वृक्षदिंडीने झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी या वृक्षदिंडीत सहभाग घेतला. या वृक्षदिंडीत सहभागी विविध शाळांच्या विद्यार्थ्यांसह शहरातील पर्यावरण प्रेमी संघटनांनी वृक्ष लागवड, संवर्धन आदी विषयांवर फलकांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. वारकऱ्याच्या वेशभूषेत दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विविध गीतांच्या माध्यमातून वृक्ष लागवडीचे महत्व पटवून सांगितले.

**३७ स्टॉलद्वारे विविध प्रकारच्या रोपांची विक्री**

'लातूर हरितोत्सव' उपक्रमात गंजगोलाई ते हनुमान मंदिर चौक परिसरात वन विभाग आणि खासगी रोपवाटिकांचे रोपांचे प्रदर्शन व विक्रीचे जवळपास ३७ स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये औषधी वनस्पती, शोभेची झाडे, परसबागेमध्ये लावण्यायोग्य झाडे, फळझाडे व फुलझाडांची रोपे, वृक्षारोपणासाठी आवश्यक सेंद्रिय खते, कुंड्या व इतर आवश्यक साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी सर्व स्टॉलला भेटी देवून तेथे आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. तसेच त्यांना वृक्ष लागवडीचे आवाहन केले. वन विभागाचे सहायक वनसंरक्षक राहुल शेळके, सामाजिक वनीकरणचे सहायक वन संरक्षक मदन क्षीरसागर यावेळी उपस्थित होते.

**वृक्ष लागवडीचे साहित्य एकाच ठिकाणी झाले उपलब्ध; नागरिकांतून समाधान**

'लातूर हरितोत्सव'च्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध ३७ नर्सरीचे स्टॉल हनुमान चौक ते गंजगोलाई परिसरात उभारण्यात आले होते. यामध्ये विविध फळांची, फुलांची, शोभेच्या झाडांची रोपे, विविध प्रकारच्या कुंड्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. एकाच ठिकाणी विविध प्रकारची रोपे आणि वृक्ष लागवडीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्याची संधी मिळाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत होते. तसेच असा उपक्रम दरवर्षी आयोजित केला जावा, अशा प्रतिक्रिया नागरिकांतून येत होत्या.

# विकास निधीतून औशाचे रुपडे बदलत आहे - आ अभिमन्यू पवार

## शहरातील धनगर गल्ली/ पाटील गल्ली येथे १२० कोटीच्या विकासकामांचा शुभारंभ

**औसा/प्रतिनिधी** : - औसा शहरातील अत्यंत महत्त्वाचा पाणीप्रश्न मिटला आहे. याचसोबत आरोग्याच्या दृष्टीने १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर असून २ एमव्हीए अतिरिक्त वीज शहरासाठी उपलब्ध करून दिल्याने वीजेचा प्रश्नही मार्गी लागला असताना औसा शहराच्या विकासासाठी या पाच वर्षांत कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देत औसा शहराचा चेहरामोहरा बदलून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न केला. येणाऱ्या काळातही शहराच्या विकासात भर घालण्यासाठी विकास निधी उपलब्ध केला जाणार आहे. एकंदरीत पुढच्या काळात शानदार औसा, पाणीदार औसा या संकल्पनेतून विकासकामे पूर्ण केली जातील अशी ग्वाही आमदार निधीतून यांनी दिली आहे.

औसा शहरातील प्रभाग क्रमांक ७ धनगर गल्ली/ पाटील गल्ली येथे १ कोटी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला या कामाचा भव्य शुभारंभ ( दि. १४) ऑगस्ट रोजी संपन्न झाला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष किरण उटगे, बाजार समितीचे उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे, नगरसेवक गोपाळ धानुरे, व्यंकटेश कोद्रे, अॅड अरविंद कुलकर्णी,औसा शहर मंडळ अध्यक्ष प्रा शिव मुरगे, समीर डेंग, बाळासाहेब सोनवळकर, जगदीश परदेशी, कल्पना डांगे, आदिनाथ धानुरे आदीसह विविध समाजाचे अध्यक्ष उपस्थित होते. याप्रसंगी आ अभिमन्यू पवार बोलत होते की देवेंद्र फडणवीस यांच्या आशिर्वादाने औसा शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावता आला. निम्न तेरणा धरणातून औसा शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ४५ कोटीची तरतूद करून औसा शहर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली ज्या योजनेअंतर्गत शहराला आज पाणीपुरवठा सुरू आहे. शहरात भव्य १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर



असून यापुढे आरोग्याच्या दृष्टीने सर्व सेवासुविधा याठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील औसा नगरपालिका क वर्ग ची आहे. या शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने ७ कोटी ५० लक्ष रुपायाचे सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. शहरातील स्वच्छता व मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे निधी उपलब्ध करून देत असताना नागरिकांनीही नगरपालिकेचा कर भरणे आवश्यक आहे. जेणेकरून विकास कामांना गती येईल. शहरात बहुतांश भागात पक्के रस्ते तयार झाले आहेत. ज्या भागात झाले नाहीत आशा भागात ते पुर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील यापुढे शहरात केवळ सिमेंट कॉँक्रीटचेच रस्ते तयार केले जाणार आहेत. असे सांगून कामामध्ये कसल्याही प्रकारचे दर्जे दार कामे केली जातील अशी ग्वाही यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार दिली.

शहराच्या विकासासाठी ५०० कोटींचा निधी - किरण उटगे

गेल्या अनेक दशकापासून जे काही कामे अपुर्ण होती . ते आ. पवार यांनी पुर्ण केली आहेत .गेल्या पाच वर्षात अडीच वर्ष कोरोना काळात गेली. अवघ्या तीन वर्षाच्या काळात ५०० कोटी रुपयांची विकास कामे शहराच्या विकासासाठी मंजूर करण्यात आली. या निधीतून अनेक कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. प्रत्येक घटकाला समान न्याय देण्याची त्यांची भूमिका राहिली आहे.शहरातील विविध भागात समान विकासनिधीतून कामे पूर्ण होत असल्याचे यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष किरण उटगे म्हणाले.

# अनेक गंभीर आजारांपासून रहाल कायम दूर, दिवसातील 'या' ५ वेळेत प्या पाणी, डॉक्टर चौहानांनी सांगितली योग्य वेळ व पद्धत

आयुर्वेदात जेवणाच्या जशा वेळा व पद्धती आहेत अगदी तसंच पाणी पिण्याची सुद्धा एक विशिष्ट पद्धत आणि वेळ असते. या वेळी पाणी प्यायल्याने अनेक गंभीर आजार टळू शकतात. जाणून घ्या डॉक्टरांनी अशा कोणत्या वेळा सांगितल्या आहेत.

दररोज आपण पाणी पितो, पण त्याचे महत्त्व आपल्याला खरोखर किती माहीत आहे? काही जण तहान लागली की पाणी पितात, काहीजण दर पाच मिनिटांनी वेळोवेळी पाण्याचा घोट घोट घेतात. पण पाणी हे फक्त तहान भागवण्यासाठी नसून आपल्या शरीरातील प्रत्येक कार्यासाठी ते आवश्यक असते. चुकीच्या वेळी पाणी पिण्यामुळे पचनावर परिणाम होतो, रक्ताभिसरणावर ताण येतो आणि काही वेळा पाणी पिल्यावर लगेचच थकवा जाणवतो. अनेक लोकांना वाटते की जितके जास्त पाणी पिऊ तितके ते चांगले, पण खरेतर पाणी केव्हा आणि कसे प्यावे, हे अधिक महत्त्वाचे आहे. पाण्याचे योग्य वेळी सेवन केल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात, त्वचा ताजीतवानी राहते आणि उर्जा टिकून राहते.

आयुर्वेदात पाणी पिण्याचे काही विशिष्ट वेळा सांगितलेले आहेत, ज्यामुळे शरीराचा ताळमेळ राखला जातो. ह्या वेळा केवळ तहान भागवण्यासाठी नव्हे, तर आरोग्य सुधारण्यासाठी निवडलेल्या असतात. पाणी पिण्याच्या या वेळांचे पालन केल्यास पचन सुधारते, वजन नियंत्रणात राहते आणि शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढते. जीवा आयुर्वेदाचे संस्थापक आणि संचालक डॉ. प्रताप चौहान यांनी इंडियन एक्स्प्रेसला याबाबत महत्त्वाची माहिती दिली. चला तर मग जाणून घेऊया दिवसभरात कोणते वेळा पाणी पिण्यासाठी सर्वोत्तम मानले जातात.



# ट्रम्प बदलले?




व्यापारविषयक आंतरराष्ट्रीय नियमांचा भंग न करता भारत रशियाकडून खनिज तेल घेत आहे. तरी ट्रम्प भारतावर जादा शुल्क लादत आहेत. ही दंडेली झाली. पुतिन त्यांना भीक घालत नाहीत, त्याची शिक्षा भारताला का?

भारतावर जादा २५ टक्के आयात शुल्क कदाचित मी लादणार नाही, असे विधान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच केले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा करण्यास अलास्काला जाण्यापूर्वी त्यांनी दूरचित्रवाहिनीशी बोलताना हे विधान केले. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के प्रत्युत्तर शुल्क लादले आहेच, त्या खेरीज रशियाकडून खनिज तेल खरेदी केल्याबद्दल २५ टक्के जादा शुल्क लादण्याची घोषणा त्यांनी केली होती. हे शुल्क येत्या दि.२७ पासून अंमलात येणे अपेक्षित आहे. कदाचित तसे घडणारही नाही; पण हा 'कदाचित' फसवा आहे, कारण ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील हे सांगणे अवघड आहे. आपण जादा शुल्काची (सेकंडरी टॅरिफ) घोषणा केल्यानंतर रशियाने एक ग्राहक, म्हणजेच भारत गमावला आहे; असा दावाही ट्रम्प यांनी केला. युक्रेनमधील युद्ध थांबवण्याबाबत चर्चा करण्यासाठी जाण्यापूर्वी त्यांनी केलेले हे विधान पुतिन यांना खिजवण्यासाठी केले असावे का? काही सांगता येत नाही. रशियावर दबाव आणण्यासाठी त्याचे खनिज तेलाचे ग्राहक तोडण्याचा त्यांचा हेतू दिसत आहे. भारत ४० टक्के तेल रशियाकडून घेतो असे ते म्हणाले. त्यांची माहिती पूर्ण चुकीची आहे असे म्हणता येत नाही; मात्र रशियाने भारत हा ग्राहक गमावला आहे हे ते कशाच्या आधारे म्हणत आहेत?

चर्चा निष्फळ

अलास्का येथे ट्रम्प-पुतिन यांची शिखर परिषद झाली, तिचा एकमेव मुद्दा युक्रेनमधील युद्ध थांबवणे हा होता. रशियाने युक्रेनवर आक्रमण केले त्यास सुमारे साडेतीन वर्षे झाली तरी ते थांबण्याची चिन्हे नाहीत. उलट युक्रेनमधील आणखी भाग रशिया कब्जात घेत आहे. रशियापुढे युक्रेनची शक्ती मुळातच कमी आहे, प्रदीर्घ काळ चाललेल्या युद्धाने तो देश अधिक कमकुवत झाला आहे ही वस्तुस्थिती आहे. 'नाटो'चे सदस्य देश युक्रेनला शस्त्रे, दारुगोळा व पैसे पुरवत असले तरी लढण्यासाठी त्याच्याकडे सैनिक कमी पडत आहेत. रशियाचेही अनेक सैनिक मारले गेले आहेत; पण उत्तर कोरियाच्या सैनिकांना आघाडीवर पाठवले जात आहे, तसेच लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे रशियाकडे आहेत. त्यांचा आणि विमानातून बॉम्ब वर्षाव रशिया युक्रेनवर सतत करत आहे. या स्थितीत युक्रेन किती काळ टिकाव धरेल? हा प्रश्न आहे. चालू महिन्यात भारताने आतापर्यंत जी एकूण तेल आयात केली त्यापैकी ३८ टक्के खनिज तेल रशियाकडून घेतले आहे. भारत तेल खरेदी करून रशियाला युद्ध चालवण्यासाठी पैसे पुरवतो, असा आरोप केला जात आहे; पण चीन रशियाकडून भारतापेक्षा जास्त तेल खरेदी करतो. शिवाय पुतिन यांना गुप्तपणे पैसा पुरवणारे अनेक देश नेते असतीलच. ट्रम्प यांना त्याची माहिती नसेल हे शक्य नाही. या दोन नेत्यांत तीन तास चर्चा झाली; पण पुतिन यांनी युद्ध थांबवण्याचे नावही घेतले नाही. मग 'उत्पादक' चर्चा झाली या त्यांच्या विधानास काय अर्थ उरतो? या चर्चेत आमच्यात जे सामंजस्य झाले त्यामुळे युक्रेनमधील शांततेचा मार्ग खुला होईल असे ते म्हणाले; पण लगेचच, युक्रेन व युरोप ही चर्चा विधायकपणे स्वीकारतील व अडथळे उभे करणार नाहीत अशी टिप्पणीही केली. झेलेन्स्की त्याच दिवशी युरोपात होते त्या संदर्भात ते बोलले. रशिया व युक्रेन 'एकच' आहेत असा पुतिन यांचा जुना दावा आहे. म्हणजेच त्या देशाचा त्यांना हवा तो भूभाग बळकावल्याखेरीज हे युद्ध थांबणार नाही हे स्पष्ट आहे. जादा शुल्काच्या धोक्यानंतरही रशियाकडून भारत तेल खरेदी करत आहे. त्याला आर्थिक कारण आहे. जर ती आयात थांबवली, तर भारताचा खनिज तेल आयातीवरील खर्च ९ ते १२ अब्ज डॉलर्सने वाढेल असे स्टेट बँकेने म्हटले आहे. भारतास ते परवडणारे नाही. इराक, सौदी अरेबिया व संयुक्त अरब एमिरात यांच्याकडून तेल खरेदी करणे हा पर्याय असला तरी तो फार स्वस्त नाही. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांचे ताजे विधान तपासावे लागेल. 'ओपेक' गटातील अन्य देशांकडून तेल खरेदी करण्याबाबत ट्रम्प भारतावर दबाव आणत आहेत का? 'कदाचित जादा शुल्क लादावे लागू नये' या विधानामुळे ट्रम्प बदलले आहेत असे समजणे धोक्याचे आहे.



**होमवर्क**

बालमित्रांनो हे चित्र पहा आपल्या आवडीचे आणि योग्य कलर निवडून हे चित्र रंगवा

# फूड पॉयझनिंग कारणे आणि बचाव करण्याचे उपाय

अनेकदा खाल्लेले अन्न बाधून त्यामुळे पोट बिघडणे, उलट्या होणे अशा समस्या उद्भवतात. यामागे खाल्लेया अन्नामध्ये असणाऱ्या बॅक्टेरियांच्या मुळे होणारे इन्फेक्शन कारणीभूत ठरत असते. सामान्यपणे हे इन्फेक्शन योग्य औषधोपचार आणि आहार यांच्यामुळे नियंत्रणात येत असले, तरी मुळात फूड पॉयझनिंग कशामुळे होते आणि ते कसे टाळता येऊ शकेल हे जाणून घेणे अगत्याचे ठरते. बहुतेकवेळा फूड पॉयझनिंग दोन प्रकारच्या जीवाणूंमुळे (रमीुग) उद्भवते.

इ,कोलाय आणि मफ्फसाल्मोनेलाफ्फ हे ते दोन जीवाणू आहेत. आपण खात असलेल्या अन्नाच्या मार्फत हे जावाणु आपल्या शरीरामध्ये प्रवेश करतात आणि त्यामुळे फुड पॉयझनिंग होऊ शकते.

इ-कोलाय या जीवाणूमुळे फूड पॉयझनिंग मुख्यत: दुध आणि दुग्धजन्य पदार्थांमधून होते. त्याचसोबत अर्धवट शिजविलेले आणि कच्चे मांसाहारी पदार्थ ही या इन्फेक्शनला कारणीभूत ठरू शकतात. पिण्याच्या अशुद्ध पाण्याच्या द्वारेही हे जीवाणू आपल्या शरीरामध्ये प्रवेश करू शकतात. जर एखाद्याची रोगप्रतिकारशक्ती अगदी कमकुवत असेल, तर त्यांच्यासाठी या जीवाणूंच्या मुळे उद्भविलेले इन्फेक्शन घातक ठरू शकते. साल्मोनेला या जीवानुमुळे होणारे फूड पॉयझनिंगही इ-कोलाय प्रमाणेच दुध, दुग्धजन्य पदार्थ, मांसाहारी पदार्थ, कच्ची अंडी, यांतून होऊ शकते. इ-कोलाय आणि साल्मोनेला या जीवाणूंमुळे फूड पॉयझनिंग झाल्यास ताप येणे, उलट्या होणे, जुलाब होणे, पोट दुखणे, मळमळणे अशी लक्षणे दिसून येतात. ही लक्षणे उद्भविल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे अगत्याचे आहे.

फूड पॉयझनिंग होऊ नये यासाठी काही गोष्टींची खबरदारी घेणे श्रेयस्कर आहे. आपल्या घरामध्ये आपल्या नकळत अनके तऱ्हेच्या जीवाणूंचा प्रादुर्भाव अनेक माध्यमांतून सातत्याने होत असतो. विशेषत: घरामध्ये ज्या ठिकाणी पाण्याचा वापर जास्त असतो त्या ठिकाणी हे जीवाणू मोठ्या प्रमाणावर उत्पन्न होत असतात. किचन, बाथरूम या ठिकाणी हे जीवाणू जास्त आढळतात. या जीवाणूंमुळे इन्फेक्शन होऊ नये यासाठी स्वयंपाकघर आणि बाथरूमची नियमित स्वच्छता आवश्यक आहे. तसेच खाद्यपदार्थ हाताळताना हात, आणि त्याचबरोबर स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारी भांडी, चॉपिंग बोर्ड, सुरी इत्यादी वस्तू स्वच्छ असतील याची खबरदारी घ्यावी. मांसाहारी आणि शाकाहारी पदार्थांसाठी वेगळ्या सुऱ्या आणि कटिंग बोर्ड वापरावेत. प्रत्येक वेळी वापर करून झाल्यांनतर सुरी आणि कटिंग बोर्ड साबणाने आणि पाण्याने स्वच्छ धुवून कोरडे करावेत.

आपण शिजवित असलेले अन्न, विशेषत: मांसाहारी पदार्थ व्यवस्थित शिजले असल्याची खात्री करून घ्यावी, भाज्या किंवा फळे कच्ची खाण्यापूर्वी गरम पाण्यामध्ये किंवा थंड पाण्यामध्ये व्हिनेगर मिसळून त्यामध्ये काही काळ घालून ठेऊन मग स्वच्छ धुवून घ्यावीत. फ्रीजमध्ये साठवून ठेवलेले पदार्थ खूप दिवसांपासून ठेवलेले असले, व चांगल्या स्थितीत दिसत असले तरी ते वापरण्याचा मोह टाळावा. ज्या ठिकाणी स्वयंपाक केला जातो तो ओटा, इतर किचन काऊंटर, गॅस स्टोव्ह दर वापरानंतर स्वच्छ पुसून घ्यावेत. अन्न साठविताना ते कच्चे असो, वा शिजविलेले, ते व्यवस्थित साठविणे महत्वाचे असते. हे दोन्ही प्रकारचे अन्नपदार्थ सीलबंद डब्यांमध्ये साठविले जावेत आणि त्याचबरोबर फ्रीजमध्ये जास्त काळ न ठेवता लवकरात लवकर त्यांचा वापर करावा.




# सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे- श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे?

### डॉक्टर टीप्स



दलिया-सकाळचा नाश्ता हा संपुर्ण दिवसभरातुन महत्वाचा आहार असतो. आणि तरीही आपल्यातले बरेचजण या गोष्टीकडे कानाडोळा करतात. जेव्हा तुम्ही नाश्ता करत नाही तेव्हा एक प्रकारे तुम्ही तुमच्या चेहे-याला स्वस्थ ठेवण्याची एक चांगली संधी गमावता. दलीया डोनट्स्, बगेल्स, आणि जेलीपेक्षा बरेच जास्त गुणधर्म दलीयात आहे. ब्रेकफास्ट न केल्याने तुमच्या खाण्यात जी कमतरता राहाते त्यामुळे तुमच्या त्वचेवर विपरीत परीणात होवु शकतो.

म्हणुन जर तुम्ही तुमच्या त्वचेला स्वस्थ आणि एकसारखी ठेवु ईच्छिता तर सकाळी सकाळी नाश्त्याच्या वेळी दलीयाचे सेवन अवश्य करा.

**(क्रमश. )**



## विनोद




**मुन्ना :** तुला जपानी बोलता येते?

**पप्पू :** हो.

**मुन्ना :** बोल बरं.

**पप्पू :** जपानी.

Santa Banta Hindi Jokes
Banta: Santa, itna udhaas kyu baita hai?
Santa: yaar betting mein maine 2000 gavaa diyaa :-(
Banta: kaise?
Santa: India pe 1000 rupaiye ka bet lagaaya tha aur India ne match haar gaya
Banta: lekin 2000 kaise?
Santa: aaj us match ka highlights daale. India pe ummeed rakh ke phir 1000 dala tha.

## संदेश

## सुविचार



जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल तर ते भ्रमिष्टपणाने वागेल.


**- स्पॅनिश म्हण**

**संस्कृत सुभाषित**

**अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।**
**(शांतीपर्व, अध्याय १०३, ेक ९, महाभारत)**

**अर्थ** -शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

**उभे शब्द**

१. 'सिने में ---, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है'
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे 'व्यसन'!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक 'घाशीराम ----'
४२. पैजेत पीळ देण्याची-उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवाहवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

**आडवे उत्तर**

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालहलाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

**उभे उत्तर**

१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त



### सारा वयाने मोठी असून अर्जुनचे लग्न आधी का करतोय सचिन तेंडुलकर?

दिल्ली-भारताचा माजी क्रिकेटर सचिन तेंडुलकरचा मुलगा क्रिकेटर अर्जुन तेंडुलकर याचा काही दिवसांपूर्वी सानिया चंडोक हिच्याशी साखरपुडा झाल्याच्या बातम्या समोर आल्या. अत्यंत मोजक्या पाहुण्यांच्या उपस्थितीत हा कौटुंबिक सोहळा पार पडल्याची माहिती आहे. परंतु अद्याप दोन्ही कुटुंबाकडून याची पुष्टी करण्यात आलेली नाही. सानिया ही अर्जुन आणि सारा यांची बालपणीप-ासूनची मैत्रीण आहे. मात्र अर्जुनच्या साखरपुड्याची बातमी समोर आल्यावर चाहत्यांमध्ये याबाबत अनेक प्रकारच्या चर्चा रंगू लागल्या. सारा तेंडुलकर ही वयाने अर्जुनपेक्षा मोठी आहे, पण तरी अर्जुनचे लग्न आधी का केलं जातंय अशा प्रश्न अनेकांना पडला. याबाबत अधिकृत माहिती मिळाली नसली तरी साराच्या लग्नाला विलंब होण्याचे एक कारण समोर आले आहे.

अर्जुनापेक्षा वयाने मोठी सारा :

सचिन तेंडुलकर आणि त्याची पत्नी अंजली यांचं पहिलं अपत्य म्हणजे सारा तेंडुलकर. सारा ही सध्या २७ वर्षांची आहे. तर सचिनचा दुसरा मुलगा अर्जुन तेंडुलकर हा २५ वर्षांचा आहे. म्हणजेच सारा पेक्षा २ वर्षांनी लहान आहे. भारतीय कुटुंबांमध्ये बऱ्याचदा मुलींचं लग्न हे आधी केलं जातं . पण साराच्या लग्नपयरवीच अर्जुन तेंडुलकरचं लग्न होणार असल्याची बातमी समोर आली. अर्जुन हा सध्या क्रिकेटमध्ये नाव कमावण्यासाठी मेहनत घेतोय. त्याने आपल्या वडिलांप्रमाणे अद्याप मोठं यश मिळवलं नसलं तरी तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून तर देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोवाकडून खेळतो. अर्जुन लहान असूनही त्याचं लग्न हे साराच्या आधी का केलं जातंय असा प्रश्न अनेकांना पडला. मीडिया रिपोर्ट्सनुसार काही लोकांचं म्हणणं आहे की सारा तेंडुलकर सध्या इंग्लंडमध्ये मेडिसिनचा अभ्यास करतेय. हे तिच्या लग्नाला उशीर होण्याचं कारण असू शकतं. सारा तेंडुलकरचं नाव मागील काही वर्षांपासून टेस्ट कर्णधार शुभमन गिल सोबत जोडलं जातंय. दोघे एकमेकांना डेट करतायत अशी सुद्धा माहिती समोर आली पण दोघांनी अद्याप याबाबत कोणतीही माहिती दिली नाही.

कोण आहे सानिया चंडोक?

सानियाने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवी घेतली आहे. खानपान व्यवसायात घई परिवाराची मजबूत पकड असून, लोकप्रिय 'ब्रुकलिन क्रीमरी'सह अनेक मोठे ब्रँड त्यांच्या मालकीचे आहेत. सानिया 'मिस्टर पॉज' नावाच्या प्रीमियम पेट सैलून, स्पा आणि स्टोअरची संस्थापक आहे. इंस्टाग्रामवरील ऽग्रि.ळप अकाउंटवर सानियाचा एक व्हिडीओ सध्या चर्चेत आहे, ज्यात ती एका पाळीव प्राण्याला उपचार करताना दिसते. पोस्टमध्ये नमूद करण्यात आलंय की, सानियाने थतडचा अइउ प्रोग्राम पूर्ण करून 'व्हेटेरिनरी टेक्निशियन' म्हणून प्रमाणपत्र मिळवलं आहे.

अर्जुन आणि सानियाच्या वयात किती आहे अंतर?

अर्जुन सध्या २५ वर्षांचा आहे तर सानिया २६ वर्षांची आहे. दोघांमध्ये साधारण दीड वर्षांचा वयाचा फरक आहे. हा किस्सा ऐकून चाहत्यांना लगेच मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांची आठवण झाली. कारण सचिनने १९९५ मध्ये अंजलीशी विवाह केला होता आणि अंजली त्यांच्यापेक्षा तब्बल पाच वर्षांनी मोठी आहे.

***

### इंडियाची सर्वात मोठी डोकेदुखी ठरु शकणाऱ्या खेळाडूलाच संघातून वग-ळले, जावेद मियाँदाद संतापला,

दिल्ली-आशिया कप २०२५ साठी पाकिस्तानचा संघ जाहीर करण्यात आला आहे, पण या संघ निवडीनंतर पाकिस्तान टीम सिलेक्टरवर टीका होतं आहे. कारण म्हणजे, माजी कर्णधार बाबर आझम आणि विकेटकीपर-फलंदाज मोहम्मद रिझवान यांना संघातून वगळण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे दोन्ही खेळाडू पाकिस्तानकडून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारे अव्वल दोन फलंदाज आहेत. तरीदेखील निवडकर्त्यांनी त्यांना स्क्वॉडमध्ये स्थान दिलेले नाही.मियांदादचा संताप-या निर्णयावर पाकिस्तानचा माजी दिग्गज क्रिकेटपटू जावेद मियांदाद संतापला असून त्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये मियांदाद म्हणतो की, ''सिलेक्टरलाच माहिती नाही ते काय करतायत. त्यांनी कधी खरंच क्रिकेट खेळली आहे का? कोणत्या पातळीवर खेळले आहेत? बाबर आझमला संघाबाहेर ठेवतायत. बाबर आझम हा महान खेळाडू आहे. क्रिकेटमध्ये चढ-उतार येतातच.

सलमान अली आगा कर्णधार

आशिया कपसाठी पाकिस्तानच्या नेतृत्वाची धुरा सलमान अली आगा याच्याकडे सोपवण्यात आली आहे. फलंदाजीत फखर जमन, साहिबजादा फरहान आणि सईम अयूब यांचा समावेश आहे. तर मोहम्मद हारिसकडे यष्टिरक्षणाची जबाबदारी असेल.

# सर्फराझ खानचे वादळी शतक!



मुंबई-भारताचा विस्फोटक फलंदाज सर्फराझ खानने मुंबईकडून खेळताना जबरदस्त शतक झळकावलं आहे. इंग्लंडविरूद्ध झालेल्या कसोटी मालिकेत सर्फराझची संघात निवड झाली नव्हती. इंग्लंडविरूद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत अनेक युवा खेळाडूंनी संधी देण्यात आली होती. पण सर्फराझ खान-ला मात्र या संघातून वगळण्यात आलं. सर्फराझने आता संधी मि ळताच शानदार शतक झळकावलं आहे.सर्फराझ खानने बूची बाबू स्पर्धेत खेळताना शानदार शतक झळकावलं आहे. बूची बाबू स्पर्धे ला सुरूवात झाली आहे. ही स्पर्धा तामिळनाडू क्रिकेट असोसिएशनद्वारे १८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान आयोजित केली जात आहे. या स्पर्धेत १६ संघ सहभागी होत आ-हेत, ज्यांना प्रत्येकी चार संघांच्या चार गटात विभागण्यात आले आहे. बूची बाबू स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताचा स्टार फलंदाज सर्फराझ खानने शतक झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. टीएनसीएविरुद्ध फलंदाजी करताना सर्फराझ खानने शानदार शतकी खेळी खेळली आणि संघाचा डाव सावरला.सर्फराझ खानने पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावलं आहे. जेव्हा तो फलंदाजीला आला तेव्हा मुंबईने ९८ धावांवर तीन विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर सर्फराझ खानने संघाचा डाव सावरला आणि वादळी शतक झळकावलं. सर्फराझ फक्त ९२ चेंडूत १०० धावांचा टप्पा गाठला. यादरम्यान त्याने ९ चौकार आणि ३ षटकारही लगावले.

सर्फराझ गेल्या काही दिवसांपासून त्याच्या फिटनेसमुळे चर्चेत आहे. टीम इंडियामध्ये निवड न झाल्याने त्याच्या फिटनेसवर खूप मेहनत घेतली. सर्फराझ खानने फक्त दीड म हिन्यात सुमारे १७ किलो वजन कमी करून सर्वांना आश्चर्यचकित केलं. वजन कमी केल्यानंतर हा त्याचा पहिलाच सामना आहे आणि या सामन्यात तो आपली छाप पाडण्यात यशस्वी झाला आहे. सर्फराझ खान आता वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या घरच्या कसोटी मालिकेत आपले स्थान निश्चित करण्यावर त्याच्या नजरा आहेत.सर्फराझ खानचा धाकटा भाऊ मुशीर खान हा देखील या स्पर्धेत मुंबई संघाचा भाग आहे. पण या स्पर्धेच्या सुरुवातीच्या डावात तो काही खास कामगिरी करू शकला नाही. या सामन्याच्या पहिल्या डावात मुशीर खानला ७५ चेंडूंत फक्त ३० धावा करता आल्या. मुशीर खानने सुरूवात केली पण तो मोठ्या खेळीत त्याचं रूपांतर करू शकला नाही.

## सूर्यकुमार यादवसह या ११ खेळाडूंची संघात जागा पक्की, राखीव ४ जागेसाठी ७ खेळाडू रेसमध्ये

### बीसीसीआई कधी करणार संघाची घोषणा?



नवी दिल्ली -पाकिस्तानने आशिया कप २०२५ साठी आपला संघ जाहीर केला आहे. मागील आशिया कपमध्ये खेळलेल्या अनेक खेळाडूंवर त्यांनी बाहेरचा रस्ता दाखवला आहे. ज्यामध्ये मोठे नाव बाबर आझम आणि विकेटकीपर मोहम्मद रिजवान याच आहे. दुसरीकडे भारतीय संघाची निवड अजून काही दिवसांत होणार आहे. यादरम्यान, अहवालात विविध दावे केले जात आहेत असेही म्हटले जात आहे की कर्णधारपदाबाबत बरेच निर्णय घेतले जाऊ शकतात. तर विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या एकदिवसीय कारकिर्दीबद्दलही अनेक अहवाल येत आहेत. परंतु असे असूनही असे ११ खेळाडू आहेत, ज्यांची आशिया कप २०२५ संघात उपस्थिती पूर्णपणे निश्चित आहे.

'या' ११ खेळाडूंची संघात जागा



पक्की

ओपनर : अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन

मिडल ऑर्डर : शुभमन गिल, कर्णधार सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा फिनिशरविकेटकीपर : रिंकू सिंह, जितेश शर्मा

ऑलराउंडर : हार्दिक पांड्या (पेस), अक्षर पटेल (स्पिन)

गोलंदाजी : अर्शदीप सिंह (पेस), वरुण चक्रवर्ती (स्पिन)

तिसऱ्या पेसरच्या जागेसाठी सिराज आणि कृष्णामध्ये चुरस

जसप्रीत बुमराह खेळला, तर तो अर्शदीपसह पेस आघाडी सांभाळेल. तिसऱ्या पेसरच्या जागेसाठी मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णामध्ये चुरस असेल. बुमराह नसेल, तर दोघेही संघात असतील, पण एकाचवेळी प्लेइंग-११ मध्ये दोघांनाही जागा मिळेल, असे वाटत नाही. इंग्लंड दौऱ्यावर सिराजने धारदार गोलंदाजी केली होती, तर कृष्णाने शेवटच्या कसोटीत चमक दाखवली आणि आयपीएल २०२५ मध्ये पर्पल कॅपही जिंकली.

अतिरिक्त ऑलराउंडरसाठी शिवम दुबे-नीतीश रेड्डी रेसमध्ये

हार्दिक पांड्या मुख्य पेस ऑलराउंडर असेलच. त्यासोबत दुसऱ्या ऑलराउंडरच्या जागेसाठी शिवम दुबे आणि नीतीश कुमार रेड्डी यांच्यात लढत होणार आहे. आकडेवारीत शिवम दुबे पुढे असला तरी नीतीश रेड्डीवर निवड समिती आणि हेड कोचचा विश्वास आहे.

श्रेयस, यशस्वी, की राहुल?

अतिरिक्त फलंदाज म्हणून श्रेयस अय्यर, यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल यांच्यात सामना आहे. केएल राहुल विकेटकीपिंगसह ओपनिंगही करू शकतो. तो अनेकदा टी२० संघात खेळण्याची इच्छा व्यक्त करत आला आहे. श्रेयस अय्यर मोठ्या स्पर्धांमध्ये नेहम ीच प्रभावी ठरला आहे, विशेषत: स्पिन गोलंदाजीवर त्याचा जबरदस्त ताबा आहे. यशस्वी जैस्वालनेही अल्पावधीत आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली दहशत निर्माण केली आहे. आता अंतिम निर्णय हेड कोच गौतम गंभीर, कर्णधार सूर्यकुमार यादव आणि मुख्य निवडकर्ता अजीत आगरकर यांच्या हातात आहे.

## मुंबईच्या खेळाडूने मैदानातच घेतला गौतम गंभीरचा बदला

मुंबई-ऑस्ट्रेलिया दौऱ्यातल्या पाचही टेस्ट मॅचमध्ये बेंचवर बसवलं, यानंतर इंग्लंड दौऱ्यातून डच्चू दिला, तरीही मुंबईकर खे-ळाडू खचला नाही. बुची बाबू इनव्हिटेशनल स्पर्धेमध्ये त्याने बॅटमधूनच प्रत्युत्तर दिलं आहे. मुंबईकर सरफराज खानने बुची बाबू स्पर्धेमध्ये खणखणीत शतक केलं आहे. ११४ बॉलमध्ये नाबाद १३८ रन करून सरफराज खान रिटायर्ड हर्ट झाला आहे. सरफराज खानने भारताकडून ६ टेस्ट मॅच खेळल्या, यात त्याने ३७ च्या सरासरीने ३७१ रन केल्या आहेत, ज्यात १ शतक आणि ३ अर्धशतकांचा सम ावेश आहे.बुची बाबू स्पर्धेमध्ये मुंबईकडून खेळताना सरफराज खानने १३८ रनच्या नाबाद खेळीमध्ये १० फोर आणि ६ सिक्स मारल्या. सरफराजने सुवेद पारकर (१२१ बॉल ७२ रन) सोबत चौथ्या विकेटसाठी ७२ रनची आणि त्यानंतर आकाश पारकरसोबत १०० रनची पार्टनरशीप केली.आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पदार्पणाच्या टेस्टमध्येच सरफराज खानने इंग्लंडविरुद्ध राजकोट टेस्टच्या दोन्ही इनिंगमध्ये अर्धशतकं झळकावली. यानंतर नोव्हेंबर २०२४ साली सरफराजने न्यूझीलंडविरुद्ध बंगळुरू टेस्टमध्ये १५० रनची खेळी केली, पण तरीही ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर सरफराजला एकही मॅच खेळण्याची संधी मिळाली नाही. तर इंग्लंड दौऱ्यातून त्याला डच्चू मिळाला. इंग्लंडम ध्ये सरफराजऐवजी करुण नायरने सहाव्या क्रमांकावर बॅटिंग केली.मुंबईकडून खेळणाऱ्या सरफराज खानची प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सरासरीने ६५.९८ एवढी आहे. मागच्या काही महिन्यांमध्ये सरफराज खानने त्याच्या फिटनेसवरही काम केलं आहे. आता बुची बाबू स्पर्धेमध्ये शतक ठोकून सरफराज खानने वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या टेस्ट सीरिजसाठी टीम इंडियाचे दरवाजे पुन्हा ठोठावले आहेत. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील २ टेस्ट मॅचची सीरिज २ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. तर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या २ टेस्ट मॅच १४-१८ नोव्हेंबरला

# पाकिस्तानविरुद्धचा सामना भारतीय संघ खेळणारच नाही

### भाजपमध्ये गेलेल्या टीम इंडियाच्या मराठमोळ्या खेळाडूचा दावा

दिल्ली-आशिया कप २०२५ मधील सर्वात मोठा चर्चेचा विषय म्हणजे भारत विरुद्ध पाकिस्तान सामना, जो १४ सप्टेंबर रोजी दुबईत रंगणार आहे. भारत आणि पाकिस्तान हे एकाच गटात आहेत. या सामन्याबाबत माजी भारतीय क्रिकेटपटू आणि भाजप नेते केदार जाधव याने मोठं विधान केलं आहे. त्याने स्पष्टपणे सांगितलं की, '''टीम इंडियाने हा सामना खेळायला नको आणि खेळणारही नाही, हे मी दाव्याने सांगतो.'' याआधीही अनेक माजी क्रिकेटपटूंनी पाकिस्तानविरुद्ध खेळू नये अशी भूमिका घेतली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर वाढलेलं तणाव

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर देशात पाकिस्तानविरुद्ध प्रचंड रोष निर्माण झाला आहे, त्याचा परिणाम क्रिकेटवरही दिसून आला. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स स्पर्धेच्या उपांत्य फेरीत इंडिया चॅम्पियन्स संघाने पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार दिला होता. त्यानंतर युवराज सिंह आणि त्याचा संघ स्पर्धेबाहेर पडला. तरीही आशिया कपमध्ये भारत-पाक सामना ठरला असून त्यावरून वाद पेटला आहे.



केदार जाधव काय म्हणाला?

एएनआयशी बोलताना केदार जाधव म्हणाला की, 'माझ्या मते भारतीय संघाने अजिबात सामना खेळू नये, आणि खेळणारही नाही, ही माझी ठाम मत आहे. भारत कुठेही खेळेल तर जिंकेल यात शंका नाही. पण पाकिस्तानविरुद्धचा हा सामना खेळायला नको आणि खेळणारही नाही, हे मी खात्रीने सांगतो.''

**हरभजन सिंह आणि अजहरुद्दीन यांचाही विरोध**

पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास विरोध करणाऱ्यांमध्ये हरभजन सिंहचेही नाव आहे. एका मुलाखतीत त्याने स्पष्ट केले होते की ''देशाचे जवान आधी, क्रिकेट नंतर.'' तर माजी कर्णधार मोहम्मद अजहरुद्दीन यांनीही भूमिका घेतली होती की, ''जर आपण त्यांच्यासोबत द्विपक्षीय मालिका खेळत नाही, तर अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही तोच दृष्टिकोन असायला हवा.'' मात्र त्यांनी हेही सांगितले होते की हा अंतिम निर्णय सरकार आणि बीसीसीआयवर अवलंबून असेल.पाकिस्तानने आशिया कप २०२५ साठी आपला संघ जाहीर केला आहे. म ागील आशिया कपमध्ये खेळलेल्या अनेक खेळाडूंवर त्यांनी बाहेरचा रस्ता दाखवला आहे. ज्यामध्ये मोठे नाव बाबर आझम आणि विकेटकीपर मोहम्मद रिजवान याच आहे. दुसरीकडे भारतीय संघाची निवड अजून काही दिवसांत होणार आहे.

आशिया कपसाठी पाकिस्तानचा संघ

सलमान अली आघा (कर्णधार), अबरार अहमद, फहीम अशरफ, फखर जमां, हारिस रऊफ, हसन अली, हसन नवाज, हुसैन तलत, खुशदिल शाह, मोहम्मद हारिस (यष्टिरक्षक), मोहम्मद नवाज, मोहम्मद वसीम ज्युनियर, साहबजादा फरहान, सैम अय्यूब, सलमान मिर्झा, शाहीन शाह आफ्रिदी आणि सुफियान मुकिम.

# आशिया कप साठी टीम इंडियात होणार २ नव्या विकेट कीपरची एन्ट्री!

मुंबई-आशिया कपसाठी टीम इंडियाची निवड मंगळवारी मुंबईमध्ये होणार आहे. अजित आगरकर यांच्या नेतृत्वातल्या निवड समितीची बैठक मंगळवारी झाल्यानंतर टीम जाहीर केली जाईल. आशिया कपसाठी कर्णधार सूर्यकुमार यादव पूर्णपणे फिट झाला आहे, तर जसप्रीत बुमराहने देखील आपण आशिया कपसाठी उपलब्ध असल्याचं बीसीसीआयला कळवलं आहे. यंदाचा आशिया कप टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार असून ८ टीम सहभागी होणार आ-हेत. ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबरदरम्यान दुबई आणि अबु धाबीमध्ये स्पर्धेचं आयोजन केलं जाणार आहे.

आशिया कपमध्ये विकेट कीपर म्हणून केएल राहुल आणि ऋषभ पंत यांची निवड व्हायची शक्यता कमी आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड दौऱ्यातील टेस्ट सीरिजमध्ये राहुल आणि पंत यांनी उत्कृष्ट कामगिरी केली होती, पण टी-२० फॉरमॅटमध्ये या दोघांनाही वगळलं जाणार असल्याचं बोललं जातंय. इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टेस्टमध्ये पंतच्या पायाला दुखापत झाली होती, त्यामुळे तो फिट नाहीये. तर केएल राहुल मागच्या बऱ्याच काळापासून भारताकडून टी-२० क्रिकेट खेळलेला नाही.

स्पोर्ट्स स्टारने दिलेल्या वृत्तानुसार संजू सॅमसन हा आशिया कपसाठी विकेट कीपर म्हणून पहिली पसंती असेल, तर जितेश शर्मा याची बॅकअप विकेट कीपर म्हणून निवड केली जाईल. आयपीएल २०२५ मध्ये जितेश शर्माने धमाकेदार कामगिरी केली होती. आरसीबीला आयपीएल ट्रॉफी जिंकवण्यातही जितेश शर्माने महत्त्वाची भूमिका बजावली. जितेश शर्माने भारताकडून ९ आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळले, यात त्याने १०० रन केल्या आहेत. १४ जानेवारी २०२४ ला जितेश शर्मा अफगाणिस्तानविरुद्ध शेवटची टी-२० आंतरराष्ट्रीय मॅच खेळला होता.

दुसरीकडे ३३ वर्षांचा केएल राहुल हा वनडे क्रिकेटमध्ये विकेट कीपर म्हणून पहिली पसंत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताला जिंकवण्यातही केएल राहुलचा महत्त्व-ाचा वाटा होता, पण केएल राहुल टीम इंडियाच्या टी-२० प्लानमधून बाहेर आहे. केएल राहुल हा टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये भारताकडून २ हजार रन करणाऱ्या ४ खेळाडूंपैकी एक आहे. केएल राहुलने शेवटची आंतरराष्ट्रीय टी-२० मॅच १० नोव्हेंबर २०२२ ला इंग्लंडविरुद्ध ॲडलेडमध्ये खेळली होती.



# ऊस लागवडीपासून तोडणी आणि गाळपापर्यंत अधिक उत्पादन व कमी खर्चासाठी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करावा : माजी मंत्री आ. देशमुख

## ट्वेंटीवन शुगर्सच्यावतीने आयोजित ऊस पीक परिसंवाद व हार्वेस्टर प्रशिक्षण उपक्रम संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** ऊस हे आपल्या प्रत्येकाच्या जीवनातील महत्वाचे पीक असून,शेतकरी,कर्मचारी,कामगार,मजूर सर्वांनी मिळून साखर उद्योगातील आव्हानांना तोंड द्यावे.ऊस लागवडीपासून तोडणी आणि गाळपापर्यंत अधिक उत्पादन व कमी खर्चासाठी प्रत्येकाने अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले आहे .

ट्वेंटीवन शुगर्स लिमिटेड उद्योग समूहाच्या वतीने शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी लातूर शहरातील हॉटेल वैष्णव येथे सर्व युनिटच्या कर्मचाऱ्यांसाठी ऊस पीक परिसंवाद आणि हार्वेस्टर मशीन प्रशिक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाला ट्वेंटीवन शुगर्सचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख,ऊस तज्ञ सुरेश माने पाटील विलास सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील,जनरल मॅनेजर संतोष बिराजदार,तसेच श्री. सुभाष पाटील, श्री. सुभाष सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की ''विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली गेल्या चार दशकांत ऊस क्षेत्रात मोठे काम झाले. विकासरत्न विलासराव देशमुख 'मांजरा' साखर कारखान्याने देशात पहिल्यांदाच १०० टक्के हार्वेस्टरने ऊसतोड केली आहे. या उपक्रमाचे श्रेय सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना जाते. हार्वेस्टर कर्मचाऱ्यांनी उत्तम काम केले तर त्यांना कायम नोकरीत सामावून घेऊ.जगात जे झाले नाही ते आपण लातूरमध्ये करून दाखवू,'' असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे ऊस तज्ञ सुरेश माने पाटील यांनी ऊस

जातींची ओळख, लागवड, खोडवा व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण, तसेच पाणी व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.विलास सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी नोंदणी, ऊस बियाणे व्यवस्थापन, अंतर मशागत, ऊस तोडणी आदी विषयांवर माहिती दिली. तर न्यू हॉलंड हार्वेस्टर कंपनीचे सुवर्णसिंग पाटील व सागर कदम यांनी मशीनविषयक प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

हार्वेस्टर ऑपरेटर व चालकांसाठी तयार केलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेचे विमोचन आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते झाले. तसेच गेल्या गळीत हंगामात सर्वाधिक तोडणी व वाहतूक करणाऱ्या हार्वेस्टर व्यवस्थापक, ऑपरेटर आणि चालकांचा सत्कारही करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले तर शेवटी आभार एस.आर.केळकर यांनी मानले.




## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे लिखित पुस्तकाचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी नुकतेच मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री नॅशनल अकॅडमी ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन येथे एक महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले. येथील अनुभवांवर आधारित त्यांच्या 'LBSNAA FROM MY LENS' या पुस्तकाचे प्रकाशन भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी या पुस्तकात प्रशिक्षण काळातील विविध प्रशिक्षण वर्ग, प्रशिक्षक यांच्याशी संवाद यासह लाल बहादूर शास्त्री नॅशनल अकॅडमी ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन मधील दिनक्रम याविषयी आपले अनुभव लिहिले आहेत.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी थेट कर्ज योजनेचे १०० कर्ज प्रस्तावांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील इच्छुक अर्जदारांनी २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. योजनेंतर्गत प्रति लाभार्थी रुपये एक लाखापर्यंत कर्ज उपलब्ध आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असावे. शहरी व ग्रामीण भागातील अर्जदारांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ३ लाखांपेक्षा जास्त नसावे. अर्जदाराने यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराने स्वत: मूळ कागदपत्रांसह कार्यालयात उपस्थित राहून अर्ज सादर करावेत. तृतीय पक्षामार्फत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. योजने अंतर्गत शेळीपालन, म्हैसपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, पंक्चर दुकान, वॉशिंग सेंटर, फळभाजी विक्री, हॉटेल व्यवसाय, फिरते साडी सेंटर, झाडू-टोपली निर्मिती, शिलाई मशिन/टेलरिंग, ब्युटी पार्लर, मसाला उद्योग, पापड उद्योग, फिरते कापड व्यवसाय, बेकरी, डोण-पत्रावळी, बांगडी व्यवसाय, गिफ्ट सेंटर इत्यादी व्यवसाय समाविष्ट आहेत.

जातीचा दाखला (महिला अर्जदारांसाठी दोन्ही नावांचा एकच दाखला असल्यास नोटरीकृत शपथपत्र), उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड (झेरॉक्स प्रती), दोन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे कोटेशन, जागेचा पुरावा (नमुना ८ अ, लाइट बिल, कर पावती, सातबारा), व्यवसायाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र किंवा अनुभव प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.), यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून लाभ न घेतल्याचे स्वयंघोषणापत्र आदी कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

अर्ज विनामूल्य उपलब्ध असून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, शिवनेरी गेट समोर, डाल्डा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर येथे अर्ज स्वीकारले जातील. उद्दिष्टापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, १४ मे २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड केली जाईल, असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी कळविले आहे.

## दै. प्रतिव्यवहार चे संपादक प्रभुअप्पा मुनाळे यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दैनिक प्रतिव्यवहारचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार प्रभुअप्पा त्रिंबकप्पा मुनाळे (मामा) यांचे सोमवार, दि.१८ ऑगस्ट २०२५ च्या पहाटे अल्पशः आजाराने मोती नगर येथील रहाते घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते.



स्व. प्रभूअप्पा मुनाळे मागच्या काही दिवसांपासून आजारी होते. उपचारादरम्यान सोमवारच्या पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. स्व. प्रभूअप्पा मुनाळे आपल्या निकटवर्तीयात मामा म्हणून ओळखले जात होते. मागील तीन दशकात लातुरात वृत्तपत्र सृष्टीत पदार्पण करू इच्छिणाऱ्यांच्या पाठीशी कायम सहकार्याची भावना ठेवणारे व्यक्तिमत्व म्हणूनही त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या पार्थिवावर येथील सिध्देश्वर स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. प्रभुअप्पा मुनाळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा दिलीप मुनाळे, एक मुलगी, सुना - नातवंडे असा परिवार आहे.


## सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजनेसाठी २७ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने सन २०२५-२६ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजना सरू केलेली आहे. प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

महसुली विभाग शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ४३ हजार रुपये, जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ३८ हजार रुपये व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता विद्यार्थ्याच्या आधार क्रमांक सलग्न असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. या योजनेतर्गत अर्ज करण्याकरीता विद्यार्थी वसतिगृह प्रवेशास पात्र असावा. विद्यार्थी महाराष्ट्रचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या तथा तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. विद्यार्थी बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. तसेच विद्यार्थ्याने इयत्ता बारावीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इतर मागास वर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आधार योजना व धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजनेतंर्गत २७ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने या संकेतस्थळावर https://hmas.mahait.org अर्ज भरावे. अधिक माहितीसाठी निरीक्षक भगवान केंद्रे (मो. न. ९५६११०९०१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

## संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष व सदस्यांनी भाजपा नेते आ. कराड यांचा सत्कार करून मानले आभार



**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती जाहीर करण्यात आली असून या समितीवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल भाजपा नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून समितीचे अध्यक्ष आणि सदस्यांनी आभार व्यक्त केले.

भाजपाचे नेते आ. श्री रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंह राजे भोसले साहेब यांनी रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती जाहीर केली असून त्यानुसार मा. जिल्हाधिकारी लातूर यांनी सदरील नियुक्तीचे पत्र नुकतेच संबंधितांना पाठविले आहे.

नव्याने गठीत करण्यात आलेल्या संजय गांधी निराधार योजना समितीत काम करण्याची संधी दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून रेणापूर तालुका समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर आणि लातूर तालुका समितीचे अध्यक्ष बन्सी भिसे यांच्यासह नवनिर्वाचित सदस्य ललिता कांबळे, अनुसया फड, विठ्ठल कस्पटे, विजय चव्हाण, सुरेश बुड्डे आणि लातूर तालुक्यातील रुपेश काळे, श्रीमती श्रुती अविनाश सवई मुरुड, रमेश लहाडे, बाबासाहेब भिसे, राजकुमार सुरवसे चिंचोली ब, विनायक मगर, योगीराज साखरे यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवतराव सोट, नवनाथ भोसले, पद्माकर चिंचोलकर, शरद दरेकर, प्रताप पाटील, सुरज शिंदे, वैभव सापसोड, डॉ. बाबासाहेब घुले, गणेश तुरूप, श्रीकृष्ण जाधव, गणेश वांगे, उत्तम पवार, गोपाळ पाटील, चंद्रकांत कातळे, साहेबराव मुळे, भैरवनाथ पिसाळ, शाम वाघमारे, धनराज शिंदे, अशोक सावंत, हनुमंत गव्हाणे, शिवाजी जाधव, रमेश केंद्रे, राम चव्हाण, प्रताप भुरे, सचिन अडतराव, राजकुमार मानमोडे, संजय डोंगरे, नाथराव गीते, बालासाहेब कदम, शुभम खोसे, बालाजी गवळी, भुजंग काळदाते, ज्ञानेश्वर जुगल, सुरेश सूर्यवंशी, श्रीकांत झाडके, प्रशांत रायनूळे, अविनाश सवई, बालाजी पारडे, ज्ञानेश्वर माचवे, विशाल कणसे, विष्णू केंद्रे, सुधाकर फुले, दत्ता आंबेकर, राम भताने, सुधाकर दहिफळे, आप्पासाहेब पाटील, सुधीर भताने, नंदकुमार नागरगोजे यांच्यासह अनेक जण होते.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनांसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि त्याअंतर्गत कार्यरत १३ उपकंपन्यांमार्फत इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. लातूर जिल्हास्तरावर या योजनांचे कामकाज कार्यान्वित करण्यात आले असून, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी विविध योजनांसाठी पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन योजनांमध्ये २० टक्के बिज भांडवल कर्ज योजना, १ रुपये लाख थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना आदी योजनांचा समावेश आहे. या सर्व योजना पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात असून, इच्छुक अर्जदारांनी महामंडळाच्या www.msobcfdc.org या अधिकृत वेबपोर्टलवर आवश्यक कागदपत्रांसह नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे.

तसेच ऑफलाईन योजनांमध्ये उर्वरित बिज भांडवल योजना, थेट कर्ज योजना या दोन योजनांचा समावेश आहे. या ऑफलाईन योजनांसाठी महामंडळाच्या लातूर जिल्हा कार्यालयात अर्ज उपलब्ध आहेत. अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा कार्यालयात अर्ज सादर करावेत.

योजनांबाबत अधिक माहितीसाठी अर्जदारांनी जिल्हा कार्यालय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डाल्डा फॅक्ट्री, शिवनेरी गेट समोर, लातूर येथे किंवा ०२३८२-२५३३३४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.


### जाहीर प्रगटन

मी, **शिवकुमार वैजनाथ मंटलाकुंटे**, (Shivkumar s/o Vaijanth Mantlakunte) वय, ४७ वर्षे, कामधंदा, व्यापार, रा. १५/१/३, फलैट नंबर २०२, भिलारेवाडी, राज टावर सी विंग, कात्रज पुणे, शपथेवर सत्य निवेदन करते की, माझे मुलीचे नाव त्याचे अधारकार्डे व शैक्षणीक कागदपत्रावरील नाव **अर्पिता शिवकुमार मंटलाकुंटे** (Arpita D/o Shivkumar Mantlakunte ) असे नाव नोंदलेले आहे, परंतु माझे मुलीच्या जन्म प्रमाणपत्रावर त्याचे नाव **अंकिता उर्फ अर्पिता शिवकुमार मंटलाकुंटे** (Ankita @ Arpita D/o Shivkumar Mantlakunte ) असे नाव नोंदलेले आहे. परंतु मला माझे मुलीचे नाव **अर्पिता शिवकुमार मंटलाकुंटे** (Arpita D/o Shivkumar Mantlakunte ) हे कायम ठेवायचे आहे, तरी माझे मुलीच्या जन्म प्रमाणपत्रावर असलेले नाव **अंकिता उर्फ अर्पिता शिवकुमार मंटलाकुंटे** (Ankita @ Arpita D/o Shivkumar Mantlakunte ) ऐवजी **अर्पिता शिवकुमार मंटलाकुंटे** ( Arpita D/o Shivkumar Mantlakunte ) असे करण्यात यावे. सदर दोन्ही नावे हे माझे मुलीचेच असुन दोन्ही नावाची व्यक्ती एकच म्हणजेच माझी मुलगी असुन तिचेशिवाय इतर दुसरी कोणीही नाही.

त्यापेक्षा उपरोक्त जाहिरनाम्यास कोणास उजर अथवा आक्षेप नोंदवायचा असेल तर हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर आपल्या हरकती मनपा येथे कळवाव्यात.

**दि. /०८/२०२५**
**ठिकाण: लातुर**

**अॅड. एम. एम. पठाण,**
**मो. ७३७८६८१०००**
**लातुर.**

### जाहीर प्रगटन

मी. **शिवकुमार वैजनाथ मंटलाकुंटे**, (Shivkumar s/o Vaijanth Mantlakunte) वय ४७ वर्षे, कामधंदा, व्यापार, रा. १५/१/३, फलैट नंबर २०२, भिलारेवाडी, राज टावर सी विंग, कात्रज पुणे, शपथेवर सत्य निवेदन करते की, माझे मुलीचे नाव त्याचे अधारकार्डे व शैक्षणीक कागदपत्रावरील नाव **साक्षी शिवकुमार मंटलाकुंटे** ( Sakshi D/o Shivkumar Mantlakunte ) असे नाव नोंदलेले आहे, परंतु माझे मुलीच्या जन्म प्रमाणपत्रावर त्याचे नाव **तृप्ती उर्फ साक्षी शिवकुमार मंटलाकुंटे** (Trupti @ Sakshi D/o Shivkumar Mantlakunte ) असे नाव नोंदलेले आहे. परंतु मला माझे मुलीचे नाव **साक्षी शिवकुमार मंटलाकुंटे** (Sakshi D/o Shivkumar Mantlakunte) हे कायम ठेवायचे आहे, तरी माझे मुलीच्या जन्म प्रमाणपत्रावर असलेले नाव **तृप्ती उर्फ साक्षी शिवकुमार मंटलाकुंटे** (Trupti @ Sakshi D/o Shivkumar Mantlakunte) **ऐवजी साक्षी शिवकुमार मंटलाकुंटे** (Sakshi D/o Shivkumar Mantlakunte) असे करण्यात यावे. सदर दोन्ही नावे हे माझे मुलीचेच असून दोन्ही नावाची व्यक्ती एकच म्हणजेच माझी मुलगी असुन तिचेशिवाय इतर दुसरी कोणीही नाही.

त्यापेक्षा उपरोक्त जाहिरनाम्यास कोणास उजर अथवा आक्षेप नोंदवायचा असेल तर हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर आपल्या हरकती मनपा येथे कळवाव्यात.

**दि. /०८/२०२५**
**ठिकाण: लातुर**

**अॅड. एम. एम. पठाण,**
**मो. ७३७८६८१०००**
**लातुर.**

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९




# धाराशिवमध्ये मंजिरी सखीच्या वार्षिक सभेत महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

धाराशिव (जिमाका) -स्वयं शिक्षण प्रयोग संस्था अंतर्गत मंजिरी सखी प्रोड्युसर कंपनीची वार्षिक सभा १४ ऑगस्ट रोजी स्वागत मंगल कार्यालय, शेकापूर रोड,धाराशिव येथे पार पडली.या निमित्ताने महिलांच्या आरोग्यासाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,डॉ.के.के.मिटकरी,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रमोद गिरी, डॉ.एस.एस. शेरखाने,डॉ.ए.ए.लोखंडे यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या शिबिरात महिलांची विनामूल्य हिमोग्लोबिन (क्त) तपासणी HEMO QR पद्धतीने करण्यात आली. शिबिरात एकूण ३६९ महिलांची तपासणी झाली. तालुका आशा समन्वयक सचिन तटाळे व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक श्री.अमित गाडे यांनी महिलांना ॲनिमिया प्रतिबंध, संतुलित आहार आणि नियमित तपासणीचे महत्त्व पटवून दिले.तसेच अवयवदान मिशन संदर्भात माहिती देत अवयवदानाचे महत्त्व,प्रक्रिया व त्यातून वाचू शकणाऱ्या जीवांविषयी जागरूकता निर्माण केली.या उपक्रमात आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविकांनी सक्रिय सहभाग घेत, तपासणी व जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# धाराशिव जिल्हा कार्यकारिणी जाहीर; नव्या नेतृत्वामुळे संघटनेला नवे बळ



धाराशिव (प्रतिनिधी)-महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेची धाराशिव जिल्हा कार्यकारिणी १३ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत एकमताने जाहीर करण्यात आली. नव्या नेतृत्वामुळे संघटनेच्या कार्यात उत्साहाचे नवे पर्व सुरू होणार असल्याचा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

जिल्हाध्यक्षपदी अनंत कुंभार, कार्याध्यक्षपदी संतोष नलावडे, सचिवपदी हेमंत भिंगारदेवे, तर कोषाध्यक्षपदी अमोल ताकभाते यांची निवड झाली. मार्गदर्शकपदी अनुप शेंगुलवार व रावसाहेब चकोर, तर संघटकपदी प्रशांतसिंह मरोड व मनोज राऊत यांची निवड झाली.

महिला प्रतिनिधी म्हणून सीमा गवळी व पद्मा मांजरे यांची निवड झाली. प्रसिद्धी प्रमुखपदी विनोद जाधव तर सह-प्रसिद्धी प्रमुखपदी मोहन राऊत यांची निवड करण्यात आली. सदस्य मंडळावर लक्ष्मण वाजे, ओंकार गायकवाड, जे.टी. वग्गे, बी. यु. उगलमोगले, अक्षय काळे व प्रदीप शिंदे यांचा समावेश करण्यात आला आहे.

या बैठकीस राज्य सरचिटणीस व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) तुकाराम भालके उपस्थित होते.

# कविता माणसाला जगण्याचे बळ देते- युवराज नळे

धाराशिव (प्रतिनिधी)-समाजाचे प्रतिबिंब कवितांच्या माध्यमातून दिसून येत असते, अन्याय अत्याचारावर कोरडे ओढण्याचे काम कविता करते, हारलेल्या थकलेल्यांना नवी उमेद कविता देते, थोडक्यात कविता माणसाला जगण्याचे बळ प्रदान करते असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक साहित्य भारतीचे देवगिरी प्रांतमंत्री युवराज नळे यांनी केले. कवयित्री संध्या पाटील यांच्या 'जयोस्तुते' व 'आणि प्रतिमेला पंख फुटले' या दोन काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती व अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था धाराशिव यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलेगाव येथील शिक्षिका संध्या दिनकरराव पाटील यांच्या दोन काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा जय हिंद विद्यालय कसबे तडवळे येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी साहित्य भारती देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे तर प्रमुख पाहुणे म्हणून डायटचे प्राचार्य दयानंद जटनुरे व ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र अत्रे हे होते. तर विस्तार अधिकारी किशोरी जोशी प्राचार्य हरिदास फेरे साहित्य भारती धाराशिव चे अध्यक्ष भागवत घेवारे कार्यवाह रवींद्र शिंदे जय हिंद विद्यालयाचे मुख्याध्यापक एस पी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डायटचे प्राचार्य दयानंद जटनुरे राजेंद्र अत्रे व प्राचार्य हरिदास फेरे यांचेही समायोजित मार्गदर्शन झाले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलेगावच्या शिक्षिका तथा कवयित्री संध्या पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांचे दोन काव्यसंग्रहाचे प्रकाशन होत असल्याबद्दल साहित्य भारती व बालकुमार साहित्य संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह प्रकाशित होत असल्यामुळे त्यांचाही प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करून अधिक प्रमाणात साहित्यिक गुण विकसित व्हावेत अशा शुभेच्छा दिल्या.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **BAGWAN TOHID JAWED.** TO: **TOHID JAVID BAGWAN.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **TOHID JAVID BAGWAN** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **BAGWAN TOHID JAWED.**
NEW NAME :- **TOHID JAVID BAGWAN.**
Address - AT POST SINDPHAL, TA. TULJAPUR, DIST. OSMANABAD-413623.
Adhar no.-246859860778
Mob. No.-7276767040

---

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SURYAWANSHI RUPA BABURAO** TO: **RUPALI RAMAKANT MANE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **RUPALI RAMAKANT MANE** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SURYAWANSHI RUPA BABURAO**
NEW NAME :- **RUPALI RAMAKANT MANE**
Address - At Post DALIMB Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413603
Adhar n.-836689918350
Mob.9960814154

---

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI KHURSHID SIRAJODDIN** TO: **KHURSHID AHMAD SIRAJODDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **KHURSHID AHMAD SIRAJODDIN KAZI** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI KHURSHID SIRAJODDIN**
NEW NAME :- **KHRSHID AHMAD SIRAJODDIN KAZI**
Address - Khaja Nagar Galli No 13 Osmanabad Taluka Osmanabad -Dist Osmanabad. -413501
Adhar n.-542282805029
Mob.9881641995


# सिद्धेश्वर'मध्ये प्रेरणा शिष्यवृत्तीचे वितरण:१९९८ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून होतकरू विद्यार्थ्यांकरिता राबवला उपक्रम

उमरगा (प्रतिनिधी)-तालुक्यातील कसगी येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयात शुक्रवारी (१५) स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १९९८ दहावीच्या माजी विद्यार्थ्यांकडून प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. माजी विद्यार्थी संजय जगताप यांच्या संकल्पनेतून प्रेरणा शिष्यवृत्ती उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.



शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय अन् गुणवत्तापुर्व कामगिरी करणाऱ्या आठवी, नववी व दहावीच्या गुणवंत, होतकरू या विद्यार्थ्यांना 'प्रेरणा शिष्यवृत्ती' व सन्मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन विठ्ठलराव पटणे, सचिव विठ्ठलराव बदोले यासह विजयसिंह राजपूत,मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे सरपंच हणमंत गुरव, अमरसिंह राजपूत, माजी विद्यार्थी प्रतिनिधी ईश्वर मुगळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाल्यानंतर शिष्यवृत्ती वितरण सोहळा संपन्न झाला.

यावेळी बोलताना सचिव बदोले यांनी माजी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत, अशा प्रकारच्या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहन हे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे सांगितले. संजय जगताप व सहकारी वर्गमित्रांच्या संकल्पनेतून या सामाजिक उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थी प्रतिनिधी ईश्वर मुगळे यांच्या पुढाकाराने आणि अथक प्रयत्नांमुळे यशस्वीपणे पार पडले.

यावेळी माजी विद्यार्थी मनोज स्वन्न, संगमेश्वर पटणे, विठ्ठल माने, शुभांगी कुलकर्णी, दीपा कुलकर्णी, शान्नप्पा कुंभार यांचे सहकार्य लाभले माजी विद्यार्थ्यानी प्रेरणा शिष्यवृत्तीसाठी अमूल्य योगदान देत उपक्रम यशस्वी करण्यात महत्वाची भूमिका बजावली.

यांना शिष्यवृत्ती प्रेरणा शिष्यवृत्तीच्या पहिल्या वर्षातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी आठवी वेदांतिका चनपटणे, मेघा कुंभार व वैभवी बदोले. नववी वर्गातील मेहराज जमादार, कीर्ती सुतार, साक्षी कुंभार तर दहावी वर्गातील सादिया मुल्ला, मीनाक्षी जमादार आणि प्रियंका बंदीछोडे. असे विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

# आदिती गोडसेचे राष्ट्रीय पातळीवर यश; महाराष्ट्रातून पहिल्या क्रमांकाचा मान




धाराशिव (प्रतिनिधी)-फाटक सरांची विद्याधन अकॅडमीची विद्यार्थीनी कुमारी आदिती रविकुमार गोडसे हिने राष्ट्रीय इंडियन मिलिटरी स्कूल डेहराडून (आर.आय.एम. सी.) साठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे धाराशिव जिल्ह्याचा मान वाढला असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.

या विद्यार्थिनीला अकॅडमीचे संचालक व माजी उपशिक्षणाधिकारी शिवाजी फाटक यांचे तसेच सायली फाटक आणि प्रियांका नागले यांचे मार्गदर्शन लाभले. सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासू वृत्ती आणि शिक्षकांच्या प्रेरणेमुळे आदितीने हे यश संपादन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल गजानन वाघमारे, मुकुंद राजेनिंबाळकर, मुकुंद रायखेलकर, सुनिल मुंडे यांच्या हस्ते आदितीचा सत्कार करण्यात आला. तिच्या या कामगिरीमुळे जिल्ह्यातील इतर विद्यार्थ्यांमध्येही प्रेरणा निर्माण झाली आहे.

विद्याधन अकॅडमीच्या आजवर १४ विद्यार्थ्यांनी विविध पदांवर यश मिळवले असून त्यापैकी पाच ते सहा विद्यार्थी लेफ्टनंट व सब लेफ्टनंट पदावर कार्यरत आहेत. या परंपरेत आता आदिती गोडसेनेही आपले नाव अभिमानाने नोंदवले आहे.

# लोहाऱ्यात ग्रामीण भागात रस्त्यांच्या हद्दी, खुणा कायम करण्याची मागणी



लोहारा(प्रतिनिधी)-पवनचक्की कंपनी आणि शेतकऱ्यांमध्ये रस्त्याच्या अंतरावरून संघर्ष वाढला आहे. याचा त्रास उद्योजकांना होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांच्या हद्दी, खुणा कायम कराव्यात, अशी मागणी बालाजी यादव यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. बालाजी यादव यांनी लोहारा तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

नायब तहसीलदार रतन काजळे यांनी हे निवेदन स्वीकारले. निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण भागातील डांबरी रस्ते शेतकरी व पवनचक्की कंपन्यांमध्ये संघर्षाचे कारण बनत आहेत. कारण या रस्त्यांचे क्षेत्र गाव नकाशावरून, शेतकऱ्यांच्या सातबारावरून महसूल प्रशासनाच्या दफ्तर दिरंगाईमुळे आजपर्यंत कमी झालेले नाही. याकरिता महसूल विभागाकडे जिल्हा स्तरावर पाठपुरावा झालेला नाही. सध्या पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्पांची कामे सुरू आहेत. पवनचक्की कंपनीची अवजड वाहने वाहतूक, सौर ऊर्जा कंपनीचे विद्युत खांब उभारणे याबाबत शेतकरी व कंपन्यांमध्ये संघर्ष होत आहे. कर्मचाऱ्यांसोबत वादावादी, हल्ला होत आहे. पवनचक्की कंपनी, सौर ऊर्जा प्रकल्पाचे अनेक ठिकाणी रस्ता अडवणे, काम थांबवण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांच्या हद्दी, खुणा कायम कराव्या. लोहारा तहसिल कार्यालयात बालाजी यादव यांनी निवेदन दिले.


## लातूर समाचार उस्मानाबाद

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649